AIIB बँकेकडून घेण्यात येणाऱ्या कर्जाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पारेषण विरहित सौर कृषीपंप देण्याच्या (मागेल त्याला सौर कृषी पंप) योजनेसाठी राज्य शासन हिस्स्यापोटी रु.७९३.७९ कोटी इतका निधी महावितरण कंपनीस वितरीत करणे बाबत.
(मागणी क्र.के-६, लेखाशीर्ष क्र.२८१००१२३)

**महाराष्ट्र शासन**
**ऊर्जा विभाग**
**शासन निर्णय, क्रमांकः बीयुडी-२०२६/प्र.क्र.१२०/ऊर्जा-७ (ई- क्र. १७१५५०९)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक: १७ जुलै, २०२६

संदर्भ:-

१. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.सौरप्र-२०२०/प्र.क्र.२५९/ऊर्जा-७,दि. १५.०३.२०२४.
२. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.सौरप्र-२०२४/प्र.क्र.९९/ऊर्जा-३,दि. १३.१२.२०२४.
३. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०७.०४.२०२५.
४. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.लेखाशिर्ष-२०२४/प्र.क्र.९५/ऊर्जा-७,दि.०६.०६.२०२५.
५. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. संकिर्ण-२०२४/प्र.क्र.९४/ऊर्जा-३,दि. १५.०९.२०२५.
६. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९.०४.२०२६.
७. शासन निर्णय, क्रमांकः बीयुडी-२०२५/प्र.क्र.१३७/ऊर्जा-७ (ई- क्र.१४२७२८२), दि.३०.०१.२०२६.
८. शासन निर्णय, क्रमांकः बीयुडी-२०२५/प्र.क्र.१३२/ऊर्जा-७ (ई- क्र.१४१०३२७), दि.२३.०३.२०२६.
९. शासन निर्णय, क्रमांकः बीयुडी-२०२५/प्र.क्र.१३७/ऊर्जा-७ (ई- क्र.१४२७२८२), दि.२४.०३.२०२६.
१०. शासन निर्णय, क्रमांकः बीयुडी-२०२४/प्र.क्र.२८/ऊर्जा-७ (ई- क्र.१२०९८७७), दि.३१.०३.२०२६.
११. महावितरण कंपनीचे पत्र क्र.संचालक(प्रकल्प)/महावितरण/१६९०६, दि २१.०५.२०२६.

**प्रस्तावना:**

शेतकऱ्यांना दिवसा, विश्वासार्ह व अखंडीत वीज पुरवठा करण्यासाठी घटक “अ” अंतर्गत ‘पारेषण विरहित सौर कृषी पंपांचे वितरण’ ५ वर्षाच्या कालावधीत ५ लक्ष पंप महावितरण कंपनीद्वारे आस्थापित करण्यास (मागेल त्याला सौर कृषीपंप योजना) आणि घटक - “आ” कृषी वितरण प्रणालीचे बळकटीकरण आणि क्षमता वाढ करणे व कृषी वितरण प्रणालीचे सौर ऊर्जीकरण महावितरण कंपनीद्वारे करण्यास शासन निर्णय दि.१५.०३.२०२४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेसाठी आवश्यक असलेल्या एकूण रक्कमेच्या अंदाजे ६०% रक्कम “बाजार कर्ज” स्वरूपात एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँक (AIIB) द्वारे राज्य शासनाकडून प्रचलित बाजार दराने कर्ज घेऊन महावितरण कंपनीला उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे. उपरोक्त दोन्ही घटकांसाठी अनुक्रमे ३०% व ४०% हिस्सा राज्य अनुदान स्वरूपामध्ये अर्थसंकल्पीय नियतव्ययातून उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

सदर योजनेअंतर्गत रु.४८१७.९७ कोटी इतका निधी सन २०२४-२८ या वर्षात राज्य शासनाच्या अर्थसंकल्पीय नियतव्यातून अनुदान स्वरुपात महावितरण कंपनीस देण्यास मान्यता देण्यात आली आहे. या योजनेंतर्गत, आशिया इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँक (एआयआयबी) कडून राज्य शासनाने घेतलेल्या कर्जाची व्याजासह परतफेड सन २०२९ ते सन २०४३ या कालावधीत

करण्यासाठी अतिरिक्त वीज विक्री कराद्वारे जमा होणाऱ्या निधीतून व हरित ऊर्जा निधीतून करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

संदर्भांधीन क्र. ७, ९ व १० येथील शासन निणर्यान्वये सन २०२५-२६ मध्ये महावितरण कंपनीने "मागेल त्याला सौर कृषी पंप" या योजनेतंर्गत सर्व वर्गवारीतील लाभार्थ्यांसाठी आस्थापित केलेल्या सौर कृषीपंपांसाठी शासन हिस्स्यापोटी रु.१६९४.२९२ कोटी इतका निधी अर्थसंकल्पिय तरतूदीतून महावितरण कंपनीस वितरीत करण्यात आलेला आहे. तसेच, संदर्भाधिन क्र.८ येथील शासन निर्णयान्वये AIIB बँकेकडून प्राप्त झालेला कर्जाचा निधी रु.१३६१.०२०८ कोटी महावितरण कंपनीस उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. संचालक (प्रकल्प), महावितरण कंपनी, मुंबई यांनी शासनास संदर्भांधीन क्र. ११ येथील दि.२१.०५.२०२६ रोजीचे पत्रान्वये सदर योजनेंतर्गत सर्व वर्गवारीतील लाभार्थ्यांकरीता आस्थापित केलेल्या ३,१७,११२ सौर कृषीपंपासाठी शासन हिस्स्याचा उर्वरीत निधी रू. ७९३.७९ कोटी उपलब्ध करून देण्याची विनंती केली होती.

"मागेल त्याला सौर कृषी पंप" या योजनेच्या घटक-अ अंतर्गत महावितरण कंपनीने सर्व वर्गवारीतील लाभार्थ्यांसाठी आस्थापित केलेल्या सौर कृषी पंपाकरीता राज्य शासन हिश्यापोटी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीमधून रू.७९३.७९ कोटी इतका निधी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या., मुंबई यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

"मागेल त्याला सौर कृषी पंप" या योजनेच्या घटक-"अ" अंतर्गत महावितरण कंपनीने सर्व वर्गवारीतील लाभार्थ्यांसाठी आस्थापित केलेल्या सौर कृषी पंपाकरीता राज्य शासन हिश्यापोटी रू. ७९३.७९ कोटी (अक्षरी रूपये सातशे त्र्याण्णव कोटी एकोणाऐंशी लाख फक्त) इतका निधी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या.,मुंबई यांना वितरीत करण्यास याद्वारे शासन मंजूरी देण्यात येत असून, सदर निधी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या.,मुंबई यांना उपलब्ध करून देण्यात येत आहे.

२. सदर रक्कम अदा करण्यासाठी श्री.नारायण श्री.कराड, सह सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी व श्रीम.अंकिता बोऱ्हाडे, कार्यासन अधिकारी, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर निधी संदर्भाधीन क्र. २ व ५ अन्वये आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रशासक म्हणून घोषित करण्यात आलेले संचालक (वित्त), महावितरण कंपनी, मुंबई यांच्या नावे अदा करण्यात यावा.

४. "मागेल त्याला सौर कृषी पंप" या योजनेच्या घटक-"अ" योजनेवरील खर्चाची उद्दिष्टे व प्रत्यक्ष साध्यता याबाबतच्या माहितीसह मासिक व त्रैमासिक अहवाल लगतच्या महिन्याच्या १० तारखेपर्यंत महावितरण कंपनीने शासनास सादर करावा. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेला निधी केवळ या योजनेसाठीच सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी खर्च करण्यात येईल, याची खातरजमा करण्यात यावी. मान्य व अनुज्ञेय काळात खर्च करण्याची जबाबदारी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांची राहील. याबाबतचा त्रैमासिक अहवाल सादर करण्याची जबाबदारी संचालक (अर्थ), महावितरण यांची राहील.

५. सदर निधीच्या लेख्यासंबंधीची कागदपत्रे, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या., यांनी आवश्यक तेव्हा महालेखापाल, मुंबई, महाराष्ट्र-१ यांच्याकडे तपासणीसाठी सादर करावीत.

६. याबाबतचा खर्च "मागणी क्रमांक के-६, २८१० नवीन व नवीकरणीय ऊर्जा, (००) (०५) महाराष्ट्र ऊर्जा विकास निधीमधून भागविलेला खर्च (कार्यक्रम), ५०, इतर खर्च (२८१००१२३)" या लेखाशीर्षाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीमधून भागविण्यात यावा. या लेखाशीर्षाखाली निधी वितरीत करण्यासाठी सादर करण्यात येणाऱ्या देयकाच्या अनुषंगाने प्रमाणित करण्यात येते की, सदर देयक सशर्त असून या लेखाशीर्षाखाली कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही, तसेच, उपयोगिता प्रमाणपत्र प्रलंबित नाही.

७. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी महावितरण कंपनी यांना निधी वितरीत करताना शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९.०४.२०२६ मधील आवश्यक त्या सूचना व अटीचे पालन करून तसेच, नियोजन विभाग (अनौ.सं.क्र.१३६/२०२६) व वित्त विभाग (अनौ.सं.क्र.२८९/२०२६/व्यय-१६) यांनी ई-नस्ती क्रमांक १७१५५०९ वर दिनांक १४.०७.२०२६ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०७१७१२२९१०१८५३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

JAYANT SHARAD SAGADE

Digitally signed by JAYANT SHARAD SAGADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD,
2.5.4.20=A6FD5F8313A5DBBC809E855BE10E149644DDC66D66F20F36D4D55BCFB56CEB55, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=5CAF6324C416282449C4078681A5B8972EB1D149920D77CC78A41448DF59C4C9, cn=JAYANT SHARAD SAGADE
Date: 2026.07.17 12:30:18 +05'30'

**(जयंत सागडे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा.सभापती/मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा यांचे सचिव, मुंबई,
३. मा.उप सभापती/मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा यांचे सचिव, मुंबई,
४. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक व औफाफ), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा.मंत्री (अपारंपरिक ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. मा.राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
९. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१०. सर्व विधानपरिषद/विधानसभा सदस्य, विधानभवन, मुंबई,
११. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
१२. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. अपर मुख्य सचिव, ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांचे स्वीय सहायक, सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई,

१७. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
१८. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२०. सचिव, मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोग, मुंबई (पत्राने),
२१. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्या.,मुंबई,
२२. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या.,मुंबई,
२३. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या.,मुंबई,
२४. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी मर्या.,मुंबई,
२५. महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), पुणे,
२६. सह सचिव (ऊर्जा-७/३), ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई,
२७. कक्ष अधिकारी (ऊर्जा-३), ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना ०३ मूळ प्रतींमध्ये पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी,
२८. ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई,
२९. निवड नस्ती/ऊर्जा-७.